


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड–महाराष्ट्र | शुक्रवार दि.१० एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक २२ | पाने ४ | पान १ | किंमत ३ रूपये




RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com







## नाशिक प्रकरणावर तपासाची घोषणा, भाविकांकडून मुंडेंना मंत्री करण्याची मागणी

# गहिनीनाथ गडावर देवेंद्र फडणवीसांचे भाष्य चर्चेत

बीड । प्रतिनिधी

नाशिकमधील आयटी कंपनीत घडलेल्या गंभीर प्रकारावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाम भूमिका घेत सखोल तपास करण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. बीड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावर आयोजित ९४ व्या नारळी सप्ताहाच्या सांगता सोहळ्यात सहभागी होत त्यांनी या प्रकरणावर भाष्य केले. याचबरोबर बारामती पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसशी संपर्क साधल्याची कबुली देत त्यांनी राजकीय चर्चेलाही वेगळं वळण दिलं.





नाशिकमध्ये काही आयटी कंपन्यांच्या माध्यमातून बेरोजगार तरुणींना नोकरीचे आमिष दाखवून त्यांना जाळ्यात ओढले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यानंतर त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करून धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचे आरोप आहेत. या प्रकरणात आतापर्यंत नऊ गुन्हे दाखल झाले असून पाच जणांना अटक करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी हे प्रकरण अत्यंत गंभीर असल्याचे सांगत, अशा प्रकारचे कृत्य कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही, याचा सखोल तपास होईल, असे स्पष्ट केले. दरम्यान, गहिनीनाथ गडावरील कार्यक्रमात बोलताना फडणवीस यांनी धार्मिक आणि सामाजिक परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले. वामनभाऊंचा वारसा विठ्ठल महाराज पुढे नेत आहेत. आम्ही ▶▶पान २ वर

### सुरेश धस आणि धनंजय मुंडे एकत्र

या धार्मिक कार्यक्रमाला राजकीय रंगही चढल्याचे पाहायला मिळाले. मंचावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री पंकजा मुंडे, आमदार सुरेश धस आणि धनंजय मुंडे हे सर्व नेते एकत्र आले होते. याआधी एकमेकांवर टीका करणारे हे नेते एकाच व्यासपीठावर दिसल्याने उपस्थितांमध्ये चर्चा रंगली. कार्यक्रमादरम्यान भाविकांनी धनंजय मुंडे यांना पुन्हा मंत्री करा, अशी जोरदार मागणी केली. या मागणीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी हसत प्रतिसाद दिला, मात्र यामुळे राजकीय वातावरणात नवीन चर्चांना उधाण आले आहे.

### गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणींना उजाळा

मुख्यमंत्री फडणवीस यांनी माजी नेते गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांच्यासोबतचा एक जुना फोटो मला भेट म्हणून मिळाला, ते पाहून मला खूप भावनिक वाटलं, असे ते म्हणाले. धार्मिक, सामाजिक आणि राजकीय अशा सर्वच अंगांनी महत्त्वपूर्ण ठरलेल्या या कार्यक्रमातून अनेक संदेश दिले गेले असून, आगामी काळात याचे परिणाम राज्याच्या राजकारणात दिसून येतील, अशी चर्चा सुरू झाली आहे.

## धनदांडग्यांच्या बांधकामावर

# पाटबंधाऱ्याचा कोट्यावधीचा मुरुम गरीबाच्या बांधकामावर मुरुमास निर्बंध ?

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हाद्दितील महसुल मंडळातील पाटबंधा–याच्या मुरुमाची दिवस व रात्री सरासपने चोरटी वाहतुक होत असतांना आणी हा सर्व प्रकार या भागातील मंडळ अधिका–याला माहीती असुन देखील या प्रकाराकडे अर्थीक कानाडोळा संबंधित प्रशासना कडुन होत असल्याचा प्रकार नुकताच समोर आल्याची तलवाडा व परिसरात चविने चर्चा होतांना ऐकावयास मिळत आहे. या बाबत अधिक माहीती अशी की दिनांक ६/४/२००२६ रोजी सकाळी तलवाडा प्रभागाचे मंडळ अधिकारी व तलवाडा पोलीसांना गोपनिय माहीती मिळाल्याचे बोलल्या जात असुन ती माहीती अशी होती की अंतरवाली रोड मसुबा मंदिरच्या पाठी मागे उजव्या कालव्याच्या डाव्या बाजुला पाटबंधा–याच्या हाद्दितील मुरुम गेल्या काही दिवसापासून रात्री दिवसा देखील सकाळी सकाळी जीसीबीच्या सह्याने भरुन हॅयवा व्दारे तलवाडा येथील छत्रपति शिवाजी महाराज चौकातील सुरु असलेल्या धनदांडग्यांच्या विशालकाय्य बांधकामावर टाकल्या जात आहे. या गोपनिय माहीती आधारे मंडळ ▶▶पान २ वर

# ९५ वर्षीय वृद्धावर कोयत्याने हल्ला

माजलगाव । प्रतिनिधी

शेतातील गवत कापण्याच्या साध्या कारणावरून माजलगाव तालुक्यातील नागडगाव येथे एका ९५ वर्षीय वृद्ध आजोबांवर कोयत्याने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. या मारहाणीत वृद्ध गंभीर जखमी झाले असून पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल केला आहे. या मारहाणीबाबत स्वतः वसंतराव श्रीरंग नेगुळे (वय ९५, रा. नागडगाव, ता. माजलगाव) यांनी तक्रार दिली आहे. सहा एप्रिल रोजी सायंकाळी साडेपाच वाजता वसंतराव हे गावातील गट क्रमांक ४५ मध्ये जनावरांसाठी गवत कापत होते. त्यावेळी आरोपी विनायक दादाराव नेगुळे आणि छबुबाई विनायक ▶▶पान २ वर

# विहिरीत पडून वृद्धाचा मृत्यू ?

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे सातेफळ येथील वाघाळवाडी व सातेफळ खसाड शिवारात एका ७० वर्षीय वयोवृद्धाचा मृतदेह विहिरीत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. छत्रभुज हरिश्चंद्र मोरे (वय ७०, रा. मोरेवाडी, ता. अंबाजोगाई) असे मृत वृद्धाचे नाव असून, ते गेल्या तीन दिवसांपासून बेपत्ता होते. छत्रभुज मोरे यांची सातेफळ शिवारात ६ ते ७ एकर जमीन आहे. १० वर्षांपूर्वी त्यांनी मोरेवाडी येथील काही जमीन विकून सातेफळ शिवारात ही जमीन खरेदी केली होती. तेव्हापासून ते आपल्या पत्नीसह शेतातच वास्तव्यास होते. त्यांचे दोन विवाहित मुले मोरेवाडी शिवारातील अडीच एकर शेती सांभाळतात. गेल्या तीन दिवसांपासून मोरे बेपत्ता होते, ज्याचा शोध घेतला जात होता. बुधवारी (८ एप्रिल), सातेफळ शिवारातील माजी सैनिक सूर्यवंशी श्रीरंग यांच्या विहिरीत एक मृतदेह तरंगताना आढळून आला. हा मृतदेह छत्रभुज मोरे यांचा असल्याची खात्री पटली आहे. दारूच्या नशेत असताना त्यांचा पाय घसरून ते विहिरीत पडले असावेत, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याचे पथक ▶▶पान २ वर



# केजचे तहसीलदार राकेश गिड्डे अपघात ठार

केज । प्रतिनिधी

केज तालुक्याचे तहसीलदार राकेश गिड्डे यांचे आज सकाळी लातूर–अंबाजोगाई महामार्गावरील रेणापूर फाट्याजवळ झालेल्या भीषण कार अपघातात निधन झाले. राकेश गिड्डे हे स्वतःच्या कारने प्रवास करत असताना त्यांच्या वाहनाचा अपघात झाला. प्राथमिक माहितीनुसार, कारमध्ये ते एकटेच होते आणि गाडी वेगात असताना अचानक नियंत्रण सुटून पलटी झाल्याने हा अपघात घडल्याचा अंदाज रेणापूर पोलिसांनी वर्तविला आहे. अपघाताची तीव्रता इतकी मोठी होती की यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने धाव घेऊन त्यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रेणापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केला आहे. एका कार्यक्षम आणि तरुण अधिकाऱ्याच्या अशा अचानक जाण्याने महसूल प्रशासनासह संपूर्ण केज तालुक्यावर मोठी शोककळा पसरली असून पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.



# स्वत:च्याच भाच्याचे दुकान पेट्रोल टाकून जाळले!

केज । प्रतिनिधी

स्वतःच्या सख्ख्या भाच्याच्या दुकानाला मध्यरात्री पेट्रोल टाकून आग लावल्याचा धक्कादायक प्रकार केज शहरात घडला आहे. या आगीत दुकानासह शेजारील दुकानांचेही मोठे नुकसान झाले असून सुमारे दीड लाख रुपयांची हानी झाली आहे. या प्रकरणी भिम पिटू सासने (वय २२, रा. फुलेनगर, केज) या तरुणाने तक्रार दाखल केली आहे. भिम याचा मंडप डेकोरेशनचा व्यवसाय असून त्याचे केजमधील बीड रोडवर दुकान आहे. सात एप्रिल रोजी मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास त्याचा सख्खा मामा गोविंद किसनराव कोंबडे (रा. फुलेनगर, केज) याने दुकानावर पेट्रोल ओतून आग लावली. या आगीत भिमच्या दुकानातील मंडपाचे साहित्य, ▶▶पान २ वर

# मस्साजोगच्या सरपंच पदासाठी अश्विनी देशमुख, स्वरूपानंद देशमुख यांचे उमेदवारी अर्ज दाखल

केज । प्रतिनिधी


मस्साजोग (ता. केज) येथील ग्रामपंचायतीचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर रिक्त झालेल्या सरपंच पदाच्या पोटनिवडणूकीसाठी स्व. देशमुख यांच्या पत्नी आणि माजी सरपंच अश्विनी देशमुख यांच्यासह देशमुखांकडून पराभूत झालेले स्वरूपानंद देशमुख यांनी गुरुवारी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे ही



निवडणूक बिनविरोध होण्यावर सध्या तरी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण करून निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. वर्षभरापासून रिक्त असलेल्या सरपंच पदाच्या पोटनिवडणूक लागली आहे. आता सरपंच पदाचा उर्वरित कार्यकाळ हा दीड वर्षाचा असून गावात २ हजार २२८४ मतदार आहेत. तर सरपंच पदाची निवडणूक जनतेतून ▶▶पान २ वर

# होमिओपॅथीक शास्त्राचे जनक डॉ.सॅम्युअल हॅनिमन

भौतिक विकासाने गुंग झालेल्या आजच्या जगातील जनतेला सत्याची मांडणी करताना देखील विचारांची दिशा भौतिक आधारावरच बसविण्याची इच्छा होते. वास्तविक पाहता सत्य शोधण्याची अथवा सिध्द करण्याची आवश्यकता पडू नये कारण, सत्य हे सत्यच आहे परंतू असत्याचा प्रभाव आजपर्यंत सत्यासंबंधी विश्वास असताना कोणीही नाहीसा करू शकला नाही. अणूच्या विभाजनाने उत्पन्न होणार्या शक्तीचा महाभयंकर प्रताप आजच्या अणूयुगात विकासाला व नाशाला किती प्रमाणात प्रभावी ठरू शकतो याचा अनुभव डोळयासमोर दिसल्याने प्रत्येक व्यकती या सिध्दांताच्या संशोधकाला जगातील श्रेष्ठ शास्त्रज्ञांच्या मालिकेत नेऊन बसविते त्याच प्रमाणे प्रत्येक पदार्थातील अणूचे विभाजन विभाजनाच्या कालमयदिपर्यंत नेहने सत्य आहे व ते विभाजन रोगी, दुःखी, जनतेला सदृढ आरोग्य देण्याचे समर्थ समाधान आहे. सिध्दांताच्या प्रयोगाने व सिध्दीकरणाने सिध्दांत मांडणारा डॉ. सॅम्युअल हॅनिमन जनतेच्या दरबारात उच्च सिंहासनावर जाऊन बसला आहे. महापुरूष कोणत्याही शाळेत किंवा कारखान्यात तयार होत नसतात ते परमेश्वरी प्रेरणेने उत्पन्न होत असतात व त्यांची उत्पत्ती ही जगाच्या कल्याणाकरीताच असल्याने त्यांच्या मार्गात येणारी सर्व संकटे नाहीशी होवून सत्याचा परिचय जगाला देत असतात असा आरोगय शास्त्रात क्रांती करणारा जनतेच्या सदृढ आरोग्याचे साधन व तत्व सांगणारा महापुरूष १० एप्रिल १७५५ साली जर्मनीतील सॅक्सोनी प्रांतात मिसेन खेड्यात मातीच्या भांडयांना रंग देणार्या गरीब बापाच्या पोटी जन्माला आला. महापुरूषाची उत्पत्ती त्यांनी केलेल्या तेजस्वी कार्याची शहानिशा करतात. डॉ.सॅम्यूअल हॅनिमन यांचे मनाने ज्ञान, लालसेची प्रचंड इच्छा असल्याने मिळेल तया वेळेचा व संधीचा योग्य उपयोग करून त्यांनी आपले ज्ञानार्जन कार्य चालू ठेवले, तीव्र इच्छाशक्ती व महान परिश्रम करण्याची तयारी असताना परमेश्वरी प्रेरणा ही साहाय्यभूत झाली. परिणामतः वयाच्या १२ व्या वर्षी ते आपल्या अनुयायांना ग्रीक भाषा समजावून देवू लागले. वयाच्या २० व्या वर्षी ३ परदेशी भाषांत व अनेक विषयात त्यांनी प्राविण्य मिळविले. आपल्या मुलाची ज्ञानार्जनाची तीव्र इच्छा पाहशिकविणे सुरू केले. रात्री भाषांतर करणे व फूरसतीच्या वेळी इतरांना शिकवीणे हा त्यांचा नित्यक्रम होवून बसला. वयाच्या २४ व्या वर्षी त्यांचे अकरा भाषांवर प्रभूत्व होते. १० ऑगस्ट १७७९ साली त्यांनी एरजेल विद्यापीठाची एम.डी.ची डिग्री मिळविली. दिन प्रतीदिनी येणार्या अनुभवांमुळे त्यांना असे वाटते की ते करीत असलेल्या रोगासंबंधीचा विचार हा परिपूर्ण नसून पुस्तकी ज्ञानावर व पर्यायाने रोगासंबंधीच्या अज्ञानावर आधारीत आहे. त्यावर कराव्या लागणार्या औषधाचे कार्य हे सुध्दा अज्ञानावर आधारीत आहे. या तीव्र औषधाचा वापर आरोग्य देण्याऐवजी मृत्यूलाच आवाहन करीत आहे. अशा प्रकारे ॲलोपॅथी करणारे प्रामाणिक चिकित्सक या नात्याने जनतेची दुःखे वाढविणारा व पर्यायाने एक खूनी म्हणून त्यांच्या हृदयात एक कंप सुरू झाला व त्यामुळे त्यांनी चिकित्सा करणे सोडून रसायनशास्व व साहित्य विषयातच आपले लक्ष घातले. भावना व सत्य यांची जोड असणारी व्यक्ती ही सदैव गुणी प्रकृती असते. त्या काळी चिकित्सेच्या पध्दती या भयानक व अपरिपक्क होत्या, राजाश्रयामुळे त्यांना राजमान्यता मिळालेली होती. सामाजिक मान्यता व बुध्दीमत्त या दोन्ही गुणांमुळे डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांनी आपल्या मनाचे व प्रामाणिकतेचे विरूध्द अगणित संपत्ती त्यांना मिळविणे शक्य झाले असते. परंतू मनाच्या प्रामाणिकतेचा प्रभाव त्यांना अधोगतीकडे नेत असतांनाही ते आपल्या ध्येयापासून विचलित झाले नाहीत. विल्यम क्यूलेन यांच्या मटेरिया मेडिका या पुस्तकातील सिंकोनाबार्क ह्या चाप्टरमध्ये ह्या औषधाच्या रसाने निरोगी मनुष्यात मलेरियाच्या तापाची लक्षणे उत्पन्न होतात व त्याचाच सुत्र भाग घेतल्याने ती लक्षणे नाहीशी होतात हे त्यांनी वाचले तेवढ्यावर त्यांचे समाधान झाले नाही तर त्यांनी स्वतःवर सिंकोना सालीचा रस काढून तो रस स्वतः घेतल्या नंतर काही वेळात त्यांच्यावर मलेरियाची लक्षणे उत्पन्न झाली व ते औषध पुन्हा घेतल्याने ती लक्षणे नाहीशी झाली या संबंधीचा विचार त्यांना अस्वस्थ करावयास लागला. ही घटना लिपझिक येथे १७९० साली घडली अत्यंत सुक्ष्मपणे निरीक्षण व प्रयोग करून व काही प्रयोग स्वतःवर, स्वतःच्या कुटूंबियांवर, मित्रांवर करून संपूर्ण सिंकोनाबार्क प्रमाणेच सर्व औषधांच्या कार्याचे परिमिश्रण त्यांना समान दिसले. १७८२ साली डेस्सू येथे जेव्हाना कुचलर यांच्याशी त्यांचा विवाह झाला नंतर त्यांनी चिकित्सा करण्यास सुरूवात केली. ध्येयासंबंधी जिद्द व वाढत्या जबाबदार्या यामुळे दिन प्रतिदीन दारिद्र्यात वृध्दी होत होती. १९७१ साली त्यांना खेड्यात जावे लागले अशा परिस्थितीत त्यांची मुले आजारी पडली या सर्व प्रकारच्या भयान आपत्तींना तोंड देत असता आपल्या ध्येयावर अधिष्ठित राहून रोगमुक्तीचा सिध्दांत त्यावेळी शोधून काढला. प्रत्येक प्रयोगाचा निष्कर्ष एकच होता की, भौतिक अवस्थेतील प्रत्येक औषध सुदृढ व्यक्तीच्या प्रकृतीवर आजार उत्पन्न करते आणि त्याच औषधाचा सुक्ष्म भाग त्या रोग्याचा रोग नाहीसा करतो. अशा प्रकारे आरोग्य जगतात चिकित्सेचा नवीन सिध्दांत समः सम् शमयति जन्म पावला. आपत्ती एकट्या येत नसतात चिकित्सकांचा मत्सर, चुकीच्या औषधाचा वापर, सभोवार पसरलेल्या अज्ञानी लोकांचा समुह, स्वतःच्या मनातील शुध्द व प्रेमळ भावना, तथाकथित चिकित्सकांची मत्सरे व उपमर्दकारक वागणूक, कायद्याचा त्रास या सर्व गोष्टींना त्रासून या महान व्यक्तीला देशही सोडावा लागून दारोदार भटकावे लागले. सन १७९७ साली आपले सारे कुटूंब व थोडेसे घरगुती सामान घेवून एका खटार्यातून हॅम्बुर्ग कडे रवाना झाले. दुर्दैवासकट सर्व संकटे त्यांच्या पाचवीला पुजलेली होती. एका चढाईवर चढून जात असतांना तो खराटा उचलला त्यांचा लहान मुलगा जखमी होवून तात्काळ मरण पावला एका मुलीचा पाय तुटला डॉ. सॅम्यूअल हॅनीमन स्वतः ही जखमी झाले. सर्व घरगुती सामान खाली असलेल्या ओढ्यात वाह दारिद्र्य ही प्रत्येक कलेची जन्मदाती आई आहे हीच गोष्ट डॉ. सॅम्यूअल हॅनिमन यांचे बाबतीत प्रकर्षान अनुभवास आली जीवनाचे प्रत्येक कार्य हे महान काव्य म्हणून घेण्याकरिता दारिद्र्य व परिश्रम या द्वारेच प्रगट होते. त्यानंतर त्यांनी ऑरगॅनन ऑफ मेडिसीन हे पुस्तक लिहून प्रकाशित केले. केले त्या पुस्तकात होमिओपॅथीची तत्वे सांगितलेली आहेत ही तत्वे कधीही न बदलणारी आहेत व ती निसर्गावरच अवलंबून आहेत. सुख आणि दुःख बरोबरच राहतात ज्या माऊलीने म्हणजे त्यांच्या पत्नीने जन्मभर दुःखाचा महान वाटा उचलला, ११ मुले व त्यांनी डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांची अविरत सेवा केली ती माऊली ३१ मार्च १८३० या वर्षी परलोकवासी झाली. डॉ. सॅम्युअल हॅनिमन यसंबंधी म्हणतात प्रत्येक व्यक्ती मायेत व संसारात इतकी मग्न होवून जाते की परमेश्वरापासून मिळत असलेल्या प्रेमाचा व आशिर्वादाचा सतत प्रवाह आपल्या जीवनात सर्व बर्या वाईट गोष्टी करण्याकरिता एकमात्र कारण आहे व तोच कर्ता करविता आहे याची जाणीव विसरून जाते. त्याच्या अखंडपणे मिळत असलेल्या कृपेला कृतघ्न होते. चिकित्सा शास्त्रात सत्चिकित्सेद्वारे मानवतेची अहर्निष सेवा करणार्या महान चिकित्सकाच्या जीवनात वयाच्या ८० व्या वर्षी एक घटना घडली. २८ जानेवारी १८३५ रोजी मेलानी डी हरबिली या ३५ वर्ष वयाच्या फ्रेंच विदेशिने त्यांच्याशी लग्न केले. या महान तत्ववेत्याच्या जीवनातील अपूर्ण राहिलेल्या कार्यात परमेश्वरी योजनेनेच साथ द्यावयाचे ठरवून डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांच्या पाठीशी शारिरीक बळ, तेजस्वी बुध्दीमत्ता व आर्थिक विपूलता श्रीमती मेलानी डी हरबिली यांच्या विवाहाने उत्पन्न करून परमेश्वराने आपले अपूर्ण राहिलेले कार्य डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांच्या कडून पूर्ण करून घेतले. पॅरीस येथे अत्यंत सुखात असतांना डॉ. सॅम्युअल हॅनिमन २ जुलै १८४३ रोजी इहलोकाची यात्रा संपविली व मृत्यू समयी त्यांनी म्हटले, मी व्यर्थ जगलो नाही. चिकित्सा शास्त्राच्या इतिहासात डॉ. सॅम्युअल ॲनिमन यांच्याशी तुलना करणारी चिकाटी, व सातत्य यांची तीव्रता, शास्त्रीय तत्वज्ञान या संबंधी उच्चतम दृष्टीकोन असलेला तत्ववेत्ता आजपर्यंत झाला नाही. स्वतःच्या अक्षरात ५०० पानाचे असे २५ पुस्तके लिहीली, १०० औषधने सिद्दीकरण केले. साधे व त्यांचे ओजस्वी जीवन हे भावी पिढीला पथदर्शक ठरणारे आहे प्रत्येक गरीब, दुःखी व कष्टी रोगी होमिओपॅथीचा तात्कालीन गुण देणार्या व कायम रोगमुक्त करणार्या स्वस्त औषधामुळे डॉ. सॅम्युअल हॅनिमन पवित्र आत्म्याला चिरंतन शांती देण्याची प्रार्थना करीत आहे.



–डॉ.अरूण भस्मे,बीड

# तुम्ही शिवसेना बळकट करा,ताकद देण्याचे काम एकनाथजी शिंदे साहेब करतील-ना.अबीटकर

## काम करणार तोच पदावर राहणार-अशोक पटवर्धन


बीड । प्रतिनिधी

आगामी काळात राज्याच्या राजकारणात मोठे बदल होण्याची शक्यता असून विधानसभेसह लोकसभेच्या मतदारसंघांमध्ये वाढ होऊ शकते, तसेच महिला आरक्षणाचा महत्त्वपूर्ण कायदा लागू होण्याची शक्यता आहे. या नव्या राजकीय टप्प्यावर शिवसेना स्वतःला सिद्ध करून नव्या जोमाने पुढे येईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे आरोग्यमंत्री तथा मराठवाडा संपर्कप्रमुख ना. प्रकाशजी अबीटकर साहेब यांनी केले. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खा. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब तसेच शिवसेना सचिव संजयजी मोरे साहेब यांच्या आदेशानुसार, बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे शिवसेना जिल्हा आढावा बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन साहेब आणि बीड लोकसभा संपर्कप्रमुख मनोजजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील संघटनात्मक



कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मंत्री अबीटकर यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना स्पष्ट शब्दांत सांगितले की, हार-तुरे घेऊन स्वतःची मिरवणूक काढणारा नव्हे, तर जनतेमध्ये राहून त्यांच्या समस्या सोडवणारा कार्यकर्ता खरा असतो. त्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना बूथ लेव्हल एजंट बीएलएचे काम प्रामाणिकपणे करण्याचे आवाहन केले. तसेच, प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना न्याय देण्याची परंपरा एकनाथजी शिंदे साहेब यांनी कायम ठेवली असल्याचे सांगत, प्रा. ज्योतीताई वाघमारे यांना राज्यसभा खासदारपदी संधी देऊन त्यांच्या मेहनतीचा सन्मान केल्याचेही त्यांनी नमूद केले. याबरोबरच मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन साहेब यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना संघटन बळकटीसाठी कानमंत्र दिले व जो काम करणार तोच पदावर कायम राहणार असल्याचे ठणकावून सांगितले. तसेच शिवसेनेच्या उपनेत्या संगीताताई ठोंबरे यांनी महिला आघाडी देखील पक्ष संघटनासाठी आपले सर्वोपरी योगदान देत राहील असे आपल्या मनोगतात नमूद केले. या बैठकीत जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर आणि चंद्रकांत नवले यांनी कार्य अहवाल सादर करत मतदारसंघातील समस्या मांडल्या. आम्हाला साथ द्या, बीड जिल्ह्यात शिवसेनेचा भगवा सर्वत्र फडकवू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर महिला आघाडी मराठवाडा संपर्क प्रमुख संगीता चव्हाण यांनी आपले मत मांडले. दरम्यान, प्रदीप माने यांची शिवसेना बीड विधानसभा संघटकपदी नियुक्ती करण्यात आली. या आढावा बैठकीस शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, शेतकरी सेना, शिक्षक सेना, ओबीसी-व्हिजेएनटी सेना तसेच विविध घटक संघटनांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बीड जिल्हा आगामी काळात मराठवाड्यातील शिवसेनेचे ऊर्जा केंद्र बनेल, असा विश्वास मंत्री ना. अबीटकर यांनी व्यक्त केला.

# जयभिम महोत्सवात काव्याचा विद्रोह



बीड । प्रतिनिधी

शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दि. ५ ते १४ एप्रिल या कालावधीत आयोजित जयभिम महोत्सवात गुरुवारी (दि. ९) पार पडलेल्या विद्रोही कवी संमेलनाने अक्षरशः विचारांची क्रांती पेटवली. अन्याय, विषमता आणि शोषणाविरुद्ध कवींच्या जाज्वल्य शब्दांनी वातावरण दणाणून गेले. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी निळूभाऊ सावरगेकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून दत्तात्रय क्षीरसागर , चंद्रप्रकाश शिंदे, वसंत ओगले यांची उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमाला वैचारिक अधिष्ठान लाभले.संमेलनात कवींनी आपल्या धारदार लेखणीतून समाजातील ज्वलंत प्रश्नांवर थेट प्रहार करत समता, न्याय आणि बंधुतेचा संदेश दिला. प्रत्येक कवितेतून विद्रोहाची ठिणगी आणि परिवर्तनाची ज्वाला प्रकट होत होती. श्रोत्यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत टाळ्यांच्या गजरात कवींच्या विचारांना दाद दिली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक कवी आबासाहेब जगझाप यांनी केले, तर प्रा. विनोद गलांडे, प्रा. पांडुरंग सुतार यांनी प्रभावी सूत्रसंचालन करत संमेलनाला सुरेख लय दिली. कार्यक्रमाच्या शेवटी सुमेध जोगदंड यांनी आभार मानले. हे विद्रोही कवी संमेलन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने मोलाचे योगदान दिले. या संमेलनाने केवळ काव्याचा आस्वादच नाही, तर अन्यायाविरुद्ध लढण्याची नवी प्रेरणा देत जयभिम महोत्सवाची उंची अधिकच वाढवली होती.

पान १ वरून

## गहिनीनाथ गडावर...

इथे पदामुळे नाही, तर भक्त म्हणून आलो आहोत, असे सांगत त्यांनी भाविकांशी संवाद साधला. विशेष म्हणजे, या गडावर २०३९ पर्यंतच्या नारळांचे बुकिंग झाले असल्याचा उल्लेख करत त्यांनी या परंपरेचे कौतुक केले. तसेच वारकरी संप्रदायाच्या सातत्याची आणि शिस्तीची प्रशंसा करत, पंढरपूर दिंडी मार्गासाठी आवश्यक सुविधा उभारण्याचे आश्वासन दिले. * हर्षवर्धन सपकाळ यांना फोन : याचवेळी बारामती पोटनिवडणुकीबाबत बोलताना फडणवीस यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना फोन करून उमेदवारी मागे घेण्याची विनंती केल्याचे सांगितले. मी प्राजक्त तनपुरे यांनाही सांगितले होते आणि त्यांनी अर्ज मागे घेतला. त्याचप्रमाणे काँग्रेसनेही विचार करावा, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे बारामतीतील राजकीय समीकरणांवर याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## पाटबंधाऱ्याचा कोट्यावधीचा...

अधिकारी तर नाही. परंतु तलवाडा पोलीसांनी त्या ठिकाणी धाव घेत मुरुमाने भरलेला हॅयवा ताब्यात घेत तदनंतर तडजोडी अंती हा मुरुम शेतकऱ्याचा म्हणत दिवसा ढवळ्या रस्त्यावरच सोडुन दिल्याची चविने चर्चा होतांना ऐकावयास मिळत असल्याने तलवाडा प्रभागाचे मंडळ अधिकारी व तलवाडा पोलीस स्टेशनला अवैध मुरुम व अवैध चोरट्या वाळु ऊपसा व विक्रिला जिल्हाधिकारी बीड, जिल्हा पोलीस अधीक्षक बीड व तहसीलदार गेवराई यांचे पाठबळ तर मिळत नाही ना? आसा प्रश्न नागरिकातुन उपस्थित केला जात असुन असेही बोलल्या जातय की पाटबंधा-याच्या दोन्ही बाजुला पाटबंधा-याची ७०/७० मिटर हद्द कार्यनिंवित असुन पाटबंधारे विभागाचे याकडे अर्थपुर्ण डोळेझाक होत असल्याने संबधित शेतकरी येथील मुरुम ऊचलन्यास लाऊन हा भाग वैती करण्यासाठी रिकामा करण्यासाठी प्रयत्नरत आसतात. तर आणेकांणी हे पाटबंधा-याचे उर्वरीत शेत्रे वैती देखील केल्याचे निदर्शनास येते तर हाच प्रकार या ठिकाणी देखील प्रतेक्षरीत्या पहावयास मिळत असतांना कोट्यावधीचा शासनाचा महसुल बुडवत हा मुरुम शेतकऱ्याचा म्हणत कार्यवाही करण्याचे सोडून देऊन चक्क रस्त्यावरच तलवाडा पोलीस मुरुमाने भरलेले हॅयवा व जेसीबी ताब्यात घेण्या ऐवजी सोडुन देतात. ही बाब अर्थीक तडजोडीचा भाग असल्याचे नागरिक बोलत असुन जिल्हा पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी बीड या कडे गांभीर्याने पाहतील का आसे बोलल्या जाऊ लागले आहे.

## विहिरीत पडून...

घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह विहिरीबाहेर काढून पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या घटनेबाबत अंबाजोगाई ग्रामीण पोलीस अधिक तपास करत आहेत.

## मस्साजोगच्या...

(मतदारातून) होणार आहे. देशमुख कुटुंबाने ग्रामस्थांचा सल्ला घेत स्व. संतोष देशमुख यांच्या पत्नी स्व. अश्विनी देशमुख यांना उभे करण्याचा निर्णय घेतला आहे. तर ही निवडणूक बिनविरोध काढण्यासाठी प्रयत्न सुरू होते. मात्र स्व. संतोष देशमुख यांच्या विरोधात पराभूत झालेले उमेदवार स्वरूपानंद देशमुख यांनी ही पोटनिवडणूक लढविण्याचा निर्णय घेत गुरुवारी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्याचबरोबर माजी सरपंच अश्विनी देशमुख यांनी तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अपघाती निधनामुळे उमेदवारी अर्ज साध्या पध्दतीने दाखल केला आहे. आज उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. उमेदवारी अर्ज भरलेल्या उमेदवारांना उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख २९ एप्रिल असून उमेदवार किती राहतात. यावर निवडणुकीचे चित्र अवलंबून आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष राहणार आहे.

## स्वत:च्याच भाच्याचे...

रोख रक्कम जळून खाक झाली. तसेच शेजारील रघुनाथ वारगजे यांच्या कृषी दुकानाचे आणि माऊली मेडिकलचेही मोठे नुकसान झाले. सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यात मामा गोविंद कोंबडे हाच आग लावत असल्याचे निष्पन्न झाले. या आगीत एकूण एक ते दीड लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी भिम सासने याच्या तक्रारीवरून केज पोलीस ठाण्यात मामाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बनसोडे करत आहेत.

## ९५ वर्षीय वृध्दावर...

नेगुळे (दोघे रा. नागडगाव) यांनी तिथे येऊन हे गवत आमचे आहे, तुम्ही कापू नका असे म्हणत वाद घालण्यास सुरुवात केली. याच वादातून आरोपी विनायक याने वसंतराव यांच्या डोक्यात कोयत्याने मारून त्यांना जखमी केले, तर छबुबाई हिने लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. या भयंकर घटनेनंतर वसंतराव यांच्या फिर्यादीवरून माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक फौजदार बळवंते करत आहेत.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# उन्हाळी हंगामासाठी पैठण उजव्या कालव्यातून चार पाणी पाळ्या मिळणार : आ. विजयसिंह पंडित

## कालवा सल्लागार समितीत ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून विविध मागण्या मान्य

**पैठण । प्रतिनिधी**

जायकवाडी धरणाच्या संदर्भाने सन २०२५-२६ च्या कालवा सल्लागार समितीची बैठक संत ज्ञानपीठ, जायकवाडी धरण, पैठण येथे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. जायकवाडी धरणाच्या पैठण उजव्या कालव्यावरील सिंचन सुविधांच्या संदर्भात आ. विजयसिंह पंडित यांनी या बैठकीत विविध मागण्या केल्या. उन्हाळी हंगामासाठी विस दिवसांच्या अंतराने चार पाणी पाळ्यांचे नियोजन करण्याची आ. पंडित



यांनी केलेली मागणी मंत्री विखे पाटील यांनी मान्य केल्यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांसह ग्रामस्थांकडून आनंद व्यक्त केला जात आहे. बैठकीला लोकप्रतिनिधींसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जायकवाडी धरणाच्या संदर्भाने सन २०२५-२६ च्या कालवा सल्लागार समितीची बैठक बुधवार, दि.८ एप्रिल रोजी संत ज्ञानपीठ, जायकवाडी धरण, पैठण येथे संपन्न झाली. राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीला मराठवाड्यातील विशेषतः जायकवाडी धरणाच्या लाभक्षेत्रातील खासदार, आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष, सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन यांसह लोकप्रतिनिधी आणि जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत कालव्यावरील सिंचन व्यवस्था वाढविण्याच्या संदर्भाने सविस्तर चर्चा झाली. गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित आणि जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी या बैठकीत पैठण उजव्या कालव्यावरील सिंचन व्यवस्थे संदर्भात विविध विषयांवर अभ्यासपूर्ण चर्चा करून अनेक मागण्या या बैठकीत मांडल्या. उन्हाळी हंगामासाठी माहे मार्च, एप्रिल, मे व जून या महिन्यांत चार पाणी पाळ्यांचे नियोजन करावे, प्रत्येक पाणी पाळी विस दिवसांच्या अंतराने करावी अशी मागणी या बैठकीत आ. विजयसिंह पंडित व अमरसिंह पंडित यांनी केली. कालव्याच्या अस्तरीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी बचत होत असल्यामुळे उन्हाळ्यात सिंचनासह पिण्याच्या पाण्यासाठी चार पाणी पाळ्यांची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत ही मागणी मान्य करून उन्हाळी हंगामासाठी चार पाणी पाळ्या देण्याचे मान्य केले. नदी पात्रातील बॅरेजचे उन्हाळ्यात पुर्नभरण करावे, चाऱ्या, वितरीका यांसह कालव्याच्या वितरण प्रणालीची दुरुस्ती तातडीने करावी, पैठण कालव्यासाठी नियोजित २५५ दलघमी पाणी पूर्ण उपलब्ध करावे, अस्तरीकरणाची कामे पूर्ण झाल्यानंतर त्रयस्त यंत्रणेकडून वहनक्षमतेची चाचणी करावी यांसह विविध मागण्या आ. विजयसिंह पंडित यांनी या बैठकीत केल्या. सिंदफणा नदीवरील सिरसमार्ग बॅरेजच्या बुडीत क्षेत्रातील रस्त्यांची कामे करावीत, राक्षसभुवन, रोहितळ, सेलु आणि कोल्हेर येथे काट नियामक छेद (एस्केप) ची कामे करावीत, टाकरवन, बेलगाव, टाकळगव्हाण आणि सेलु येथे कालव्यावरील पुलांची कामे करावीत यांसह विविध मागण्या माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी या बैठकीत केल्या. आ. विजयसिंह पंडित आणि माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. या मागण्यांबाबतचे लेखी निवेदनही आ.पंडित यांनी जलसंपदा मंत्री यांना दिले.

# जनगणना २०२७ अंतर्गत बीड येथे फिल्ड ट्रेनरच्या तीन दिवशी प्रशिक्षणास प्रारंभ

**बीड । प्रतिनिधी**

भारताची जनगणना २०२७ अंतर्गत गृह सूचीकरण व गृहनिर्माण जनगणनांना या महत्त्वपूर्ण टप्प्याच्या पूर्वतयारीसाठी बीड जिल्ह्यात बीड ट्रेनर्सच्या तीन दिवशी प्रशिक्षणास प्रारंभ झाला आहे. जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथील जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित या प्रशिक्षणात जिल्ह्यातील एकूण ९० फील्ड ट्रेनर सहभागी झाले आहेत. हे प्रशिक्षण दोन टप्प्यात बॅचेस मध्ये आयोजित करण्यात आले असून बॅच क्रमांक एक व दोन साठी दि. ६ एप्रिल ते ८ एप्रिल २०२६ आणि ब्याच क्रमांक ३ साठी दिनांक ९ एप्रिल ते अकरा एप्रिल २०२६ असा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. प्रशिक्षण दररोज सकाळी १०:३० वाजता सुरू होत असून यामध्ये तांत्रिक कौशल्य कार्यपद्धती तसेच प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाजाबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात येत आहे. या प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की जनगणना ही केवळ आकडेवारी नसून देशाच्या पुढील दहा वर्षाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे त्यामुळे ही प्रक्रिया वेळेत अचूक व पारदर्शकपणे पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच घर यादी तयार करताना जिल्ह्यातील प्रत्येक घर व प्रत्येक कुटुंबाची अचूक नोंद होईल यासाठी प्रगनक व प्रर्यवेशकांनी विशेष दक्षता घ्यावी. अशा सूचना फील्ड ट्रेनर्स यांना केल्या. नागरिकांशी सकारात्मक संवाद साधून त्यांचा जनगणनेत सक्रिय सहभाग वाढविण्याचे त्यांनी आवाहन केले. या प्रशिक्षणासाठी मास्टर ट्रेनर म्हणून शैलेश खडसे मुख्याधिकारी नगरपरिषद बीड, अनुज गोठी उपस्थिती होती.



*इंटरनॅशनल ऑलिम्पियाड परीक्षेमध्ये राजवीर गव्हाणे याला गोल्ड मेडल मिळाल्याबद्दल शुभेच्छा देताना शाळेचे शिक्षक, कर्मचारी व माजलगाव येथील प्रसिद्ध साई बॅग हाऊसचे संचालक मदन गव्हाणे व छायाचित्रात इत्यादी दिसत आहेत. (छाया- संभाजी लांडे पाटील)*

## अखंड हरिनाम सप्ताहात रक्तदान शिबिर संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील अंजनवती येथे श्री संत तुकाविप्र महाराजांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या हनुमान मंदिरात सालाबादप्रमाणे अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात सुरू असून यंदा ५१ व्या वर्षाचा महोत्सव साजरा केला जात आहे. महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी आध्यात्मिक कार्यक्रमाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

रक्तदान हेच श्रेष्ठदान या भावनेतून गावातील तरुण मंडळी व ग्रामस्थांनी एकत्र येत या शिबिरात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शिबिराचा शुभारंभ श्री संत तुकाविप्र महाराज पालखी प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा दिंडीचालक ह.भ.प. अर्जुन महाराज पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भारत बबनराव येडे पाटील व बाळासाहेब विजयराव येडे पाटील हे प्रारंभीचे रक्तदाते ठरले. गावातील तरुणांनी केलेल्या या सामाजिक उपक्रमाचे भजनी मंडळ व ग्रामस्थांनी विशेष कौतुक केले. कार्यक्रमास पैठण येथील सुप्रसिद्ध गायनाचार्य ह.भ.प. रामेश्वर महाराज मस्के, विठ्ठलराव अंजनवतीकर, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब मोरे पाटील, अशोकराजे येडे, बाजीराव भूमकर, सिद्धार्थ सोनवणे यांच्यासह बीड येथून आलेले डॉक्टर व आरोग्य कर्मचारी, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने भक्तीबरोबरच समाजसेवेचा संदेश देणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे.



*वाकड पुणे : नवीन सुरू झालेल्या Mangeshaz Luxurious सलून चे उद्घाटन अत्यंत उत्साहात माझ्या हस्ते तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक व विरोधी पक्षनेते नाना उर्फ विठ्ठल काटे आणि प्रसिद्ध अभिनेत्री स्मिता शेवाळेयांच्या हस्ते पार पडले. या नवीन व्यवसायाच्या शुभारंभाबद्दल मंगेश व त्यांच्या कुटुंबियांचे मनःपूर्वक अभिनंदन करत, त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. या आधुनिक व सुसज्ज सलूनच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांना उत्कृष्ट, दर्जेदार व आधुनिक सेवा मिळणार असल्याचा विश्वास आहे. या उद्घाटन सोहळ्याला नगरसेवक निलेश बारणे, भाजपा युवा नेते रणजीत आबा कलाटे तसेच मंगेश यांचे कुटुंबीय, मित्रपरिवार व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

## बीड जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत आगामी काळात १४ एप्रिल २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती असल्याने संपूर्ण जिल्हयात पुढील कालावधीत महिनाभर जयंती मिरवणूका निघत आहेत. तसेच विविध राजकीय पक्ष, संघटेच्या वतीने त्यांचे न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि.२५एप्रिल २०२६ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

## निर्व्यसनी समाज उभारणे हेच महापुरुषांना खरे अभिवादन ! जयभिम महोत्सव:प्रा.संदीप कदम यांचे प्रतिपादन

**बीड । प्रतिनिधी**

आदर्श आणि सुसंस्कृत समाज घडवायचा असेल, तर सर्वप्रथम निर्व्यसनी समाज निर्माण करणे गरजेचे आहे. हाच खरा मार्ग महापुरुषांच्या विचारांना प्रत्यक्षात उतरवण्याचा असून, तेच त्यांना दिलेले खरे अभिवादन ठरेल, असे प्रतिपादन प्रा. संदीप कदम यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बीड शहरात बुधवारी (दि.८) रोजी आयोजित जयभीम महोत्सवातील व्याख्यानमालेत प्रा. संदिप कदम बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. गणेश मस्के होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सुशीला मोराळे, किसन तांगडे, डॉ. आनंद पिंगळे, पी. व्ही. बनसोडे आणि नितीन बावणे यांची उपस्थिती होती.

प्रा. कदम पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देशावर अमूल्य असे ऋण असून, त्यांची विद्वत्ता आणि कार्याचा आवाका मोजणे अशक्य आहे. त्यांनी दिलेल्या शिक्षण, समता आणि विज्ञाननिष्ठ विचारांचा अंगीकार केल्याशिवाय समाज प्रगत होऊ शकत नाही. आजच्या काळात माध्यमांची भूमिका, समाजावर होणारा परिणाम आणि वाढती अंधश्रद्धा यांचे गांभीर्याने विश्लेषण होणे आवश्यक आहे. कर्मकांड आणि अंधश्रद्धा ही समाजाला लागलेली कीड असून, त्यापासून दूर राहणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. राजेश शिंदे यांनी केले.

# इथल्या मनुवादी व्यवस्थेला आमची मते चालतात मग आमचे अण्णा भाऊ साठे का चालत नाहीत..? : आझाद क्रांती सेनेचे अध्यक्ष राजेश घोडे यांचा सरकारला सवाल

**वडवणी । प्रतिनिधी**

इथल्या मनुवादी व्यवस्थेला आमची मते चालतात मग आमचे अण्णा भाऊ साठे का चालत नाहीत..? असा सवाल उपस्थित करीत त्यांचा विरोध केवळ अण्णाभाऊंच्या पुतळ्याला नाही तर त्यांचा विरोध हा अण्णाभाऊंच्या विचारांना आहे. असा आरोप करीत जर खामगाव येथील अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा हटवण्याचा प्रयत्न केला तर येथील मनुवादी व्यवस्था आणि आरएसएसला हद्दपार केल्याशिवाय राहणार नाही असा इशारा आझाद क्रांती सेनेचे अध्यक्ष राजेश घोडे यांनी दिला.

बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव नगरपालिका हद्दीतील रेल्वे स्टेशनच्या शेजारील जागेमध्ये सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसवला असून गेल्या अनेक वर्षापासून अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाची मागणी समाजाच्या वतीने करण्यात येत आहे. तेथील पुतळा नगरपालिका व पोलीस प्रशासनाच्या माध्यमातून उचलण्याचा प्रयत्न करण्यात आल्याने गेल्या पंधरा दिवसापासून समाजाच्या वतीने साखळी उपोषण करण्यात येत आहे. आझाद क्रांती सेनेचे अध्यक्ष



राजेश घोडे यांनी आपल्या सहकार्यासह जाऊन या ठिकाणी भेट दिली. खामगाव येथील सत्यशोधक अण्णाभाऊ यांच्या पुतळ्याला हार घालून आझाद क्रांती सेना या लढ्यामध्ये

### मंत्र्याच्या बापाचा पुतळा बसवायचा आहे का..?

**खामगाव नगरपालिका, आमदार, व मंत्री, हे भाजपाचे असून गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत भाजपाची सत्ता आहे. तेव्हा भाजपच्या मंत्र्याच्या बापाचा पुतळा बसवायचा असल्याने अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यांना विरोध मंत्र्याकडूनच होत आहे. असा आरोप आझाद क्रांती सेनेचे अध्यक्ष राजेश घोडे यांनी केला.**

खंबीरपणे उभी असल्याचा शब्द समाज बांधवांना त्यांनी दिला. यावेळी पुढे बोलताना राजेश घोडे म्हणाले की, बाबासाहेबांच्या विचारापासून या समाजाला तोडण्याचे डावपेच मागील अनेक वर्षापासून या देशात सुरू आहेत. आम्ही आमच्या हक्कासाठी लोकशाही मार्गाने लढा देत आहोत, मात्र आमचा लढ्याला येथील मनुवादी ताकद दाबण्याचा प्रयत्न करत आहे. आमची लढाई संविधानिक आहे, मात्र आमची लढाई जर इथल्या मनुवादी व्यवस्थेला कळत नसेल तर या देशातून आरएसएस आणि मानुवादी व्यवस्थेला हद्दपार करण्यासाठी बाबासाहेब आणि अण्णाभाऊ यांचे लेकरं रणांगणात उतरलेले आहेत हे लक्षात घ्या.

तुम्हाला हजारो पुतळे चालतात, मग अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा का चालत नाही? अण्णाभाऊ आमची अस्मिता आहे आणि आमच्या अस्मितेसाठी आम्ही मरायला सुद्धा तयार आहोत. हा संदेश खामगावच्या तरुणांनी महाराष्ट्राला दिला आहे. मी या तरुणांचे अभिनंदन आणि आभार मानतो. तुम्ही महाराष्ट्रातील मातंग समाजामध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहात. अण्णाभाऊंच्या पुतळ्याची विटंबना जर केली तर महाराष्ट्रातील लेकरु लेकरुसुद्धा रणांगणात उतरेल आणि या सरकारलाच हटविल्याशिवाय राहणार नाही असा इशारा दिला.

या प्रसंगी आझाद क्रांती सेना माजलगाव ता. प्रमुख अशोक ढगे, आझाद क्रांती सेना ऊसतोड कामगार संघटना माजलगाव ता. प्रमुख तुकाराम जाधव, नवनाथ लोखंडे, आकाशात हातागळे, राहुल गायकवाड व समाज बांधव उपस्थित होते.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शुक्रवार दि. १० एप्रिल २०२६ •



*बीड : पूर्वीच्या काळी महिला पहाटे उठून जात्यावर दळण दळून भाकरी थापायच्या मात्र आधुनिक युगामध्ये हे जाते लुप्त होत चालले आहे, आणखीही काही घरच्यांनी जुनी परंपरा कायम ठेवली आहे. उन्हाळ्याच्या पापड्या घालण्यासाठी जात्यावर दळण दळताना ज्योती नरनाळे ... उगवला नारायण, दारी आली पहाट, सडा संमार्जन, करा गा घराट! बाई सोनियाच्या जाती, भरडे मोतीची जवारी, दळण दळतो गा हरी, मायबाप माझा!!*




*तलवाडा - सात्वणपर भेट .... तलवाडा येथील सामाजिक कार्यकर्ते राजाभाऊ विटकर यांचे वडील विठ्ठलराव राजाराम विटकर यांचे नुकतेच राहत्या घरी निधन झाले होते. त्यांच्या निवास्थानी सात्वणपर भेट दिं ९/४/२००२६ रोजी बाळराजे दादा पवार, बळीभाऊ माने, भगवान घुबांर्डे, बप्पासाहे घाटुळ(नाना) हे उपस्थित होते.*

# ज्ञानराधा मल्टीस्टेटचे कामकाज आता जिल्हा उपनिबंधक पाहणार

## ठेवीदारांची सोय झाली : ॲड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी ही संस्था अवसायनात आहे. या संस्थेचा कारभार छत्रपती संभाजी नगर येथून जिल्हा उपनिबंधक समर्थक जाधव हे पाहत होते. केंद्र शासनाच्या नव्या नियुक्तीनुसार आता बीडचे जिल्हा उपनिबंधक श्री. सतीश तोटावार हे अवसायक म्हणून कामकाज पाहणार आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील आणि जिल्ह्या बाहेरील ठेवीदारांना आता संपर्कासाठी सोयीचे होणार असल्याचे जन आंदोलनाचे



विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे. केंद्रीय निबंधक सहकारी संस्था, नवी दिल्ली यांनी दिनांक ०३ मार्च २०२६ रोजी अवसायकाचा पदभार हस्तांतरणाबाबत आदेश दिलेला आहे. या आदेशाप्रमाणे अवसायक म्हणून काम पाहत असलेले छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा उपनिबंधक श्री. सम्रत जाधव यांनी बीड येथील जिल्हा उपनिबंधक सतीश तोटावार यांच्याकडे दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी पदभार सोपवला आहे. तोटावार यांनी या संस्थेचा चार्ज घेतला आहे. जिल्ह्यात ठेविदारांची संख्या मोठी असल्याने आता जिल्ह्यातील ठेवीदारांना स्थानिक स्तरावर संपर्क करण्यासाठी सोपे होईल. या निमित्ताने तोटावार यांना देखील ठेवीदारांशी संवाद साधण्याची संधी निर्माण झाली आहे, असेही ॲड. अजित देशमुख यांनी म्हटले.

## बीड नगर पालिकेच्या ताफ्यात अद्यावत स्वच्छता वाहन नव्या सत्ताधाऱ्याकडून लोकसेवेत दाखल

### आमदार विजयसिंह पंडित, व मा. जिल्हाधिकारी साहेब यांचे आभार : प्रेमलताताई पारवे, विनोद मुळूक

**बीड । प्रतिनिधी**

शहराच्या स्वच्छता व्यवस्थेला बळकटी देणारी अत्याधुनिक आपत्कालीन स्वच्छता प्रतिसाद गाडी (एाशीसशपलू ठशीर्ििपीश डरपळींरींळेप णपळीं) आज नगरपालिकेच्या ताफ्यात दाखल झाली असून,स्व.अजित दादा पवार यांच्या सूचनेनुसार मा.ना. पालकमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांच्या आदेशानुसार मा.आमदार विजयसिंह पंडित व मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्या पुढाकारातून ही गाडी बीड नगरपालिकेस उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमाबद्दल नगरपालिका प्रशासनाच्या वतीने आ.विजयसिंह पंडित साहेब ,जिल्हाधिकारी साहेबांचे मनः



पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. या गाडीचा अधिकृत शुभारंभ नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे उपनगराध्यक्ष विनोद मुळूक,स्वच्छता सभापती शेख निजाम यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, प्रवक्ते भागवतजी तावरे, नगरसेवक,जैतुल्ला खान,शेख अशफाक इनामदार, मनोज गोडसे, नगरसेवक दत्ता जाधव यांच्यासह सर्व पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी या गाडीचे प्रात्यक्षिक पाहून तिच्या कार्यक्षमतेचे कौतुक केले. अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेली ही गाडी शहरातील गटार साफसफाई, सांडपाणी व्यवस्थापन आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. गाडीत उच्च क्षमतेचे व्हॅक्युम सक्शन सिस्टम, हाय-प्रेशर जेटिंग मशीन, पाणी व कचरा साठवण टाक्या तसेच आधुनिक पाईप व नोजल प्रणाली उपलब्ध असून, त्यामुळे गटारातील अडथळे जलदगतीने दूर करणे शक्य होणार आहे.

## महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसची प्रदेश कार्यकारिणी जाहीर

### गणेश उबाळे यांची प्रदेश सरचिटणीस पदी निवड

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसची विस्तारित प्रदेश कार्यकारणी मुंबई येथील प्रदेश कार्यालयातून प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांच्या हस्ते जाहीर करण्यात आली. या नव्या कार्यकारणीत गेवराईचे गणेश उबाळे यांची प्रदेश सरचिटणीस पदी निवड करण्यात आली.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या या विस्तारित प्रदेश कार्यकारणीत, उपाध्यक्ष, सरचिटणीस, व सचिव अशा तब्बल १२४ पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या कार्यकारणीत गेवराई तालुक्यातील गणेश उबाळे यांना महत्वाच्या अश्या प्रदेश सरचिटणीस पदावर जबाबदारी मिळाल्याने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात समाधान व्यक्त होत आहे. गणेश उबाळे यांनी यापूर्वी युवक काँग्रेसमध्ये सचिव पदावर म्हणून यशस्वीपणे काम केले असून आता प्रदेश सरचिटणीस माध्यमातून त्यांच्यावर



आणखी मोठी जबाबदारी सोपविण्यात आली आहे. गेवराई तालुक्यातील भेंड खुर्द येथील रहिवासी असलेल्या गणेश उबाळे यांनी आपल्या स्वकर्तृत्वावर संघटनेत ठसा उमटवला आहे. या नियुक्तीबद्दल बोलताना गणेश उबाळे यांनी सांगितले की, वरिष्ठ नेतृत्वाने त्यांच्यावर दाखवलेला विश्वास ते निश्चितच सार्थ ठरवतील व संघटनेला अधिक बळकटी देण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करतील. यावेळी त्यांनी माजी खासदार रजनी ताई पाटील, प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, राष्ट्रीय सरचिटणीस तथा महाराष्ट्र प्रभारी अजय छिकारा, सहप्रभारी नवजोत सिंग संधू, तसेच महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस आदित्य पाटील, बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राहूल सोनवणे तसेच सर्व नेत्यांचे आभार मानले. गणेश उबाळे यांच्या निवडीमुळे बीड जिल्हा युवक काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून युवक काँग्रेसच्या कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास पदाधिकारी यांच्या कडून व्यक्त केला जात आहे.

## ऋषीकेश लाहोटी यांचे सी.एफ.ए.परिक्षेत यश



**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील विजय इंडस्ट्रीजचे संचालक श्री.सत्यनारायणजी लाहोटी यांचे नातू ऋषीकेश विजयकुमार लाहोटी हे सी.एफ.ए.इन्स्टिट्यूट ची अंतिम परिक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झाले असून बीड जिल्ह्यातून सी.एफ.ए. ही परिक्षा उत्तीर्ण होण्याचा मान त्यांनी प्राप्त केला असुन त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे. या बद्दल सविस्तर माहिती अशी की, बीड येथील विजय इंडस्ट्रीजचे संचालक व मराठवाडा चेंबर्स ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष श्री.सत्यनारायणजी लाहोटी यांचे नातू ऋषीकेश लाहोटी यांनी आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध करत अमेरिकेतील 'सी.एफ.ए इन्स्टिट्यूट'ची (CFA Institute, USA) अंतिम परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण केली आहे. ही पदवी गुंतवणूक आणि वित्त क्षेत्रातील जगातील सर्वोच्च मानली जाते. ऋषीकेश यांनी पुण्यात राहून या कठीण परीक्षेची तयारी पूर्ण केली. 'सी.एफ.ए इन्स्टिट्यूट' ही एक जागतिक स्तरावरील नफाविरहित संस्था असून, ती गुंतवणूक व्यावसायिकांसाठी उच्च दर्जाचे वित्त शिक्षण प्रदान करते. नैतिक मूल्ये, शिक्षण आणि उत्कृष्टतेचा उच्च दर्जा राखून ही संस्था वित्त क्षेत्राचे भविष्य घडवण्याचे कार्य करते. ऋषीकेश यांनी मिळवलेले हे यश केवळ त्यांच्यासाठीच नव्हे, तर बीड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. या जागतिक पदवीचा उपयोग करून भविष्यात समाजासाठी आणि अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी योगदान देण्याचा त्यांचा मानस आहे. लाहोटी परिवार हा व्यवसाया सोबतच उच्च विद्याविभूषित असून ऋषीकेश यांच्या सोबतच त्यांचे मोठे बंधु श्री.मधुसुदनजी लाहोटी हे देखील आर्किटेक्चर असुन त्यांच्या व्यवसायामध्ये बीड शहरामध्ये निपुन आहेत.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व जागतिक आरोग्य दिनानिमित्त आरोग्य शिबीर संपन्न

### • बीड शहर पोलिसांचा स्तुत्य उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आणि जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधत बीड शहर पोलीस ठाण्याच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजसेवेचा



वसा जपणाऱ्या आंबेडकरांच्या विचारांना अनुसरून हा उपक्रम राबविण्यात आला.

पोलीस दल व सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहावे या उद्देशाने आयोजित या शिबिरात नामांकित तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी करून मार्गदर्शन केले. हृदयविकार, मधुमेह, न्यूरोविकार तसेच अस्थिरोग यांसारख्या आजारांवर सल्ला व उपचार देण्यात आले. सायंकाळी ५ ते ७ या वेळेत पार पडलेल्या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

डॉ. सुनील बोबडे यांनी दररोज किमान ४५ मिनिटे व्यायाम करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. प्रमोद शिंदे यांनी मोबाईलच्या अति वापरामुळे मानेच्या आजारांत वाढ होत असल्याचे सांगत योग्य पोश्चर ठेवण्याचा सल्ला दिला. तर डॉ. विशाल पिंगळकर यांनी मान व पाठीच्या विकारांकडे दुर्लक्ष न करता वेळेत उपचार घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सचिन पांडकर यांनी सांगितले की, अशा उपक्रमांमुळे पोलीस व नागरिक यांच्यातील संवाद वाढून परस्पर विश्वास दृढ होतो. या शिबिराचा एकूण ७२ नागरिकांनी लाभ घेतला असून, तपासणीसोबतच मोफत औषधांचे वाटपही करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, भागवत सानप, राजेंद्र मुंडे व शहंशा सय्यद यांनी विशेष परिश्रम घेतले. बीड शहर पोलिसांच्या या उपक्रमातून निरोगी बीड, सुरक्षित बीड हा संदेश प्रभावीपणे दिला गेला आहे.

# महामार्गावर विहिरींचा मृत्युचा सापळा ; प्रवाशांच्या जीवाशी खेळ ! प्रशासनाचे दुर्लक्ष; दिंडोरीसारखी घटना घडण्याची वाट पाहताय का ?





## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे तक्रार – डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या विविध महामार्गांवर तब्बल ५४ अपघात प्रवण (ब्लॅक स्पॉट) स्थळे असताना, रस्त्यालगत असलेल्या धोकादायक विहिरींचा प्रश्न गंभीर बनला आहे. जिल्हा प्रशासन व वाहतूक विभागाच्या दुर्लक्षामुळे या विहिरी संभाव्य अपघातांचे मोठे कारण ठरत असल्याचे सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी म्हटले आहे. यासंदर्भात त्यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी,राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथे ३ एप्रिल रोजी नुकत्याच घडलेल्या कार विहिरीत कोसळून ९ जणांचा मृत्यू झालेल्या ज्यात ७ मयत बालकांचा समावेश असलेल्या घटनेचा दाखला देत, अशीच दुर्दैवी घटना घडण्याची प्रशासन वाट पाहत आहे काय? असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

बीड जिल्ह्यातील धोकादायक ठिकाणे- बीड जिल्ह्यातील अनेक ठिकाणी रस्त्याच्या अगदी कडेला विहिरी असून त्या अपघातास कारणीभूत ठरण्याची शक्यता आहे. काही प्रमुख ठिकाणे पुढीलप्रमाणे: अहमदपूर-अहिल्यानगर महामार्गावर लिंबागणेशजवळ मुळुकवाडी शिवार, होळ परिसर, धुळे-सोलापूर महामार्गावर चौसाळा जवळ, बीड-शिरूर मार्गावर नागाची वाडी, अंबेजोगाई-लातूर मार्गावर बर्दापूर, कल्याण-विशाखापट्टणम मार्गावर मातोरी पुढे, मादळमोही परिसर, सिरसदेवी फाटा पुढे, शेगाव-पंढरपूर मार्गावर पात्रुड व तांबवा परिसर-या सर्व ठिकाणी विहिरींना मजबूत सिमेंटचे संरक्षण कठडे नसल्याने मोठा धोका निर्माण झाला आहे.

लिंबागणेश जवळील मुळुकवाडी परिसरात गंभीर परिस्थिती

अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग ५४८डी महामार्गावरील लिंबागणेशजवळील मुळुकवाडी शिवारात रस्ता आणि विहीर यामध्ये अंतरच नाही. येथे पूर्वी दोन अपघात झाल्यानंतर डॉ . गणेश ढवळे यांनी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर तात्पुरता पत्र्याचा कठडा उभारण्यात आला; मात्र, वेगवान वाहतुकीसमोर तो निष्प्रभ ठरत आहे. येथे मजबूत सिमेंट भिंत उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. यापूर्वीच्या अपघातांच्या घटना नागाची वाडी फाटा (शिरूर कासार रोड): कार विहिरीच्या काठाला धडकून तरुणाचा मृत्यू, मुळुकवाडी (फेब्रुवारी): जीप कठडा तोडून विहिरीजवळ कोसळली (जिवितहानी टळली), होळ परिसर (ऑगस्ट २०२५): कार विहिरीच्या कठड्याला धडकून एकाचा मृत्यू

मुख्य मागण्या- डॉ. गणेश ढवळे यांनी प्रशासनाकडे पुढील मागण्या केल्या आहेत: रस्त्यालगतच्या सर्व विहिरींचे तात्काळ सर्वे क्षण, मजबूत सिमेंट संरक्षण भिंती/कठडे उभारणे, धोकादायक ठिकाणी इशारा फलक व प्रकाश व्यवस्था. अपघात प्रवण स्थळांवर तातडीने सुरक्षा उपाययोजना अपघात होण्याची वाट न पाहता प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.